// गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- registrar@unigug.ac.in दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- establishment.section@unigug.ac.in

जा.क्र. गो.वि./आस्था./२१८२/२०२२ दि. २२ /०६/२०२२

# सुचना

**विषय:- शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या रजा मंजुरीबाबत.**

संदर्भ :- मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग यांचे कार्यालयीन पत्र जाक्र उशिनाग/वेप/३६२०/२२, दि. २१/०६/२०२२.

सर्व संबंधितांना याद्वारे सुचित करण्यात येते की, विषयांकीत प्रकरणी काही महाविद्यालयांकडून कर्मचाऱ्याची रजा मंजूर करण्यापुर्वीच कर्मचारी रजेवर असताना त्यांचे नियमित वेतन काढण्यात येत असून (Bloking of Govt. Funds) ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरीता रजेवर असलेल्या कर्मचाऱ्यांस दरमहा वाहतूक भत्ता प्रदान केला जात असल्याची बाब मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग यांना निदर्शनास आलेली आहे.

सदर बाब गंभीर तसेच शासन नियमाविरुध्द असल्याने सर्व महाविद्यालये / विद्यापीठ यांनी, कोणत्याही शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांची रजा विशेषत: वैद्यकीय रजा, संबंधित कर्मचारी कामावर पुर्वरत रुजू झाल्यानंतर मंजूर केल्यानंतर त्यांचे रजा कालावधीचे वेतन काढण्यात यावे. तसेच ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरीता कर्मचारी रजेवर असल्यास त्यांना शासन वित्त व विभाग निर्णय दि. १४/१२/१९९८ मधील अ.क्र. ३ नुसार वाहतूक भत्ता अनुज्ञेय ठरत नसल्याने नियमानुसार तपासून संबंधिताचे रजा वेतन काढण्यात यावे. तसेच यापूर्वी शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी मंजूर केलेल्या रजेच्या कालावधीत वाहतूक भत्ता प्रदान केला असल्यास त्या अतिप्रदानाची वसुली करुन शासन जमा करण्यात यावी, असे संदर्भिय पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

भविष्यात शासकीय निधीचे वर नमुद प्रमाणे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांच्या वेतनातून रक्कम वसून करण्यात येईल, असेही सुचित करण्यात आले आहे.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार त्वरित कार्यवाही घ्यावी.

संलग्न - वरीलप्रमाणे.

22/6/2022

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु महोदयांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
६. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,
जुने मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर
Website: dirhe.in/jdnagpur/
Fax No. 0712-2554210
E mail: jdhengp@rediffmail.com
Phone No.0712 2561713

जा.क्रमांक:उशिनाग/वेप/ ३६२० /२२ दिनांक :- २१/०६/२०२२

प्रति,

कुलसचिव,
रातुम नागपूर विद्यापीठ/गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली/
कवि कुल.कालिदास विद्यापीठ, रामटेक
प्राचार्य,
सर्व अनुशासकीय अनुदानित महाविद्यालये, नागपूर विभाग

**विषय :- शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या रजा मंजुरीबाबत.**

विषयांकीत प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, काही महाविद्यालयांकडून कर्मचा-याची रजा मंजूर करण्यापूर्वीच कर्मचारी रजेवर असतांना त्यांचे नियमित वेतन काढण्यात येत असून (Blocking of Govt Funds) ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरिता रजेवर असलेल्या कर्मचा-यास दरमहा वाहतूक भत्ता प्रदान केला जात आहे. सदर बाब गंभीर असून शासन नियमाविरूध्द आहे.

तरी या व्दारे सर्व महाविद्यालये/विद्यापीठ यांना कळविण्यात येते की, कोणत्याही शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची रजा विशेषत: वैद्यकीय रजा, संबंधित कर्मचारी कामावर पूर्ववत रूजू झाल्यानंतर मंजूर केल्यानंतर त्यांचे रजा कालावधीचे वेतन काढण्यात यावे. तसेच ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधी करिता कर्मचारी रजेवर असल्यास त्यांना शासन वित्त विभाग निर्णय दि.१४ डिसेंबर १९९८ मधील अ.क्र.३ नुसार वाहतूक भत्ता अनुज्ञेय ठरत नसल्याने नियमानुसार तपासून संबंधिताचे रजा वेतन काढण्यात यावे. तसेच यापूर्वी आपल्या महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना ३० दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी मंजूर केलेल्या रजेच्या कालावधीत वाहतूक भत्ता प्रदान केला असल्यास त्या अतिप्रदानाची वसुली करून शासन जमा करण्यात यावी.

भविष्यात शासकीय निधीचे वर नमूद प्रमाणे अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित वेतन लिपिक व प्राचार्य यांचे वेतनातून रक्कम वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सहपत्र : निरंक

DR (ESU)

Pl. issue circular and for colleges submit report of uni. teachers / Employees

2216

( डॉ.संजय ठाकरे )
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

आदिशाक
तात्काळ कार्यवाही स्वव
22.06.2022

Dr. Deshmukh (AR)
for information & further necessary Action.
22/6/2022

363 22/6/22